28 MAY 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी प्रकाश पवार, अरुण भोसले

## रणधीर शिंदे, आनंद पाटील, नवनाथ गोरे, रवींद्र बेडकिहाळ साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य : राज्य शासनाकडून पुनर्रचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची शासनाने पुनर्रचना केली आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. प्रकाश पवार, डॉ. अरुण भोसले यांची विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी, तर प्रा. डॉ. रणधीर शिंदे, नवनाथ गोरे, डॉ. आनंद पाटील, रविंद्र बेडकिहाळ, प्रविण बांदेकर, प्रसाद कुलकर्णी यांची साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सदस्यपदी गुरुवारी नियुक्ती झाली आहे.


प्रकाश पवार


अरुण भोसले


रणधीर शिंदे


आनंद पाटील


नवनाथ गोरे


शामराव पाटील


प्रदीप पाटील


संजय ठिगळे


प्रवीण बांदेकर


प्रसाद कुलकर्णी


रवींद्र बेडकिहाळ


कृष्णदेव गिरी

विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षपदी पुणे येथील डॉ. श्रीधर तथा राजा दीक्षित यांची, तर विविध क्षेत्राशी निगडित अन्य २४ जणांची सदस्यपदी शासनाने नियुक्ती केली. त्यातील सदस्यांमध्ये शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. प्रकाश पवार, इतिहास विभागाचे माजी प्रमुख डॉ. अरुण भोसले व डॉ. कृष्णदेव गिरी यांचा समावेश आहे. डॉ. पवार हे सध्या विश्वकोश मंडळाच्या विद्यापीठातील राज्यशास्त्र अभ्यासमंडळाचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. डॉ. भोसले यांनी यापूर्वीही विश्वकोश मंडळाचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे. साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांची आणि अन्य २९ जणांची सदस्यपदी नियुक्ती केली आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, संशोधक विद्यार्थी व साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार विजेते नवनाथ गोरे, डॉ. आनंद पाटील, रविंद्र बेडकिहाळ, प्रविण बांदेकर, प्रसाद कुलकर्णी यांचा समावेश आहे. या मंडळावर डॉ. शिंदे यांची दुसऱ्यांदा निवड झाली आहे. या दोन्ही मंडळांच्या अध्यक्ष आणि सदस्यांच्या नियुक्तीचा कालावधी तीन वर्षे किंवा पुढील आदेश होईपर्यंत यातील जे आधी घडेल तोपर्यंत आहे. या नियुक्तीचा आदेश मराठी भाषा विभागाने गुरुवारी काढला आहे.

### इस्लामपूरच्या दोघांचा समावेश

इस्लामपूर (जि.सांगली) येथील कवी प्रा. प्रदीप पाटील आणि कासेगाव एज्युकेशन सोसायटीमध्ये काम केलेले प्रा. शामराव पाटील यांची साहित्य संस्कृती मंडळाच्या सदस्यपदी, तर सांगली येथील प्रा. संजय ठिगळे यांची विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी नियुक्ती झाली आहे.

पुढारी

# साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी सदानंद मोरे

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळावर ज्येष्ठ साहित्यिक सदानंद मोरे यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या शिवाय साहित्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या २९ सदस्यांची पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदस्यांची नावे : डॉ. प्रज्ञा दया पवार, अरुण शेवते, डॉ. रणधीर शिंदे, श्रीमती निरजा, प्रेमानंद गज्वी, डॉ. नागनाथ कोतापल्ले, प्रवीण बांदेकर, श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, भारत सासणे, फ. मु. शिंदे, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. रवींद्र शोभणे, योगेंद्र ठाकूर, प्रसाद कुलकर्णी, प्रकाश खांडगे, प्रा. एल. बी. पाटील, पुष्पराज गावंडे, विलास सिंदगीकर, प्रा. प्रदीप यशवंत पाटील, डॉ. आनंद पाटील, प्रा. शामराव पाटील, दिनेश आवटी, धनंजय गुडसुरकर, नवनाथ गोरे, रवींद्र बेडकीहाळ, प्रा. रंगनाथ पठारे, उत्तम कांबळे, विनोद शिरसाठ, डॉ. संतोष खेडलेकर.



## डॉ. रणधीर शिंदे यांची निवड



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख व समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांची राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून निवड झाली आहे. डॉ. शिंदे हे बार्शी (जि. सोलापूर) तालुक्यातील घाणेगावचे आहे. १९९८ नंतर त्यांनी पाच वर्ष सांगलीच्या जी. डी.बापू लाड महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले. सध्या ते शिवाजी विद्यापीठात विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. काव्य समीक्षा, वैचारिक लेखन त्यांचे विषय आहेत. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. रणधीर शिंदे व फेसाटीकार नवनाथ गोरे यांची साहित्य मंडळावर निवड झाली. गुरु-शिष्याची जोडीची पहिल्यांदाच निवड झाली आहे.

# विश्वकोश मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. श्रीधर दीक्षित



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी राजीनामा दिल्यामुळे मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे. डॉ. श्रीधर दीक्षित यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ५ मार्च २०१९ रोजी ३० सदस्यांच्या मंडळाची स्थापना करण्यात आली होती. हे मंडळ तीन वर्षांसाठी अस्तित्वात असणार होते. तत्पूर्वी करंबेळकर यांनी राजीनामा दिला. नवीन मंडळातील सदस्य पुढीलप्रमाणे : डॉ. भीमराव उलमेक, डॉ. श्रीनंद बापट, डॉ. अरुण भोसले, राहुल देशमुख, प्रभाकर देव, हेमंत राजोपाध्ये, सतीश आळेकर, सुबोध जावडेकर, आसाराम लोमटे, डॉ. रवींद्र रवींद्रनाथ, निखिलेश चित्रे, डॉ. प्रकाश पवार, शर्मिला फडके, डॉ. प्राची देशपांडे, प्राची दुबळे, डॉ. सदाशिव पाटील, प्रा. संजय ठिगळे, डॉ. कृष्णदेव गिरी, डॉ. विशाल इंगोले, डॉ. निंबा नांद्रे, प्रा. संतोष पवार, मनीषा उगले, भाऊसाहेब चासकर व प्रा. उल्हास पाटील.

पुढारी

राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ

# सदस्यपदी डॉ. अरुण भोसले, डॉ. प्रकाश पवार यांची निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी प्रमुख प्रा.डॉ.अरुण भोसले व राजकीय विश्लेषक व राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. प्रकाश पवार यांची निवड झाली आहे.



डॉ. अरुण भोसले डॉ. प्रकाश पवार

मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाची पुनर्रचना करण्यात आली असून सदस्य निवडीचा शासन निर्णय गुरुवारी झाला. डॉ. भोसले कलेडोण (जि.सातारा) येथील आहेत. १९७२ ला एम.ए. केल्यानंतर वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे त्यांनी प्राध्यापक म्हणून काम सुरू केले. १९७७ पासून शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागात रूजू झाले. १९९९ ते २००८ पर्यंत ते विभागप्रमुख होते. मराठा इतिहास संशोधन मंडळाचे संचालक होते. २००३ रोजी शिवाजी विद्यापीठ व त्यानंतर २००६ ला राज्य शासनाच्या आदर्श शिक्षक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. दुसऱ्यांना सदस्यपदाची संधी मिळाल्याचा आनंद आहे. विश्वकोष खंड पुनर्लेखन, विस्तार व नव्याने नोंदी करण्याचे काम येत्या काळात करण्याचा मानस आहे.

डॉ. पवार हे कळंब (वालचंदनगर, इंदापूर, जि. पुणे) येथील आहेत. त्यांनी १९९५ रोजी आण्णासाहेब मगर महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून कारकीर्द सुरू केली. २०१३ ला शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून रूजू झाले. २०१७ ते २०१९ या काळात ते राज्यशास्त्र विभागप्रमुख होते. डॉ. पवार यांची राज्यशास्त्राचे अभ्यासक व राजकीय विश्लेषक म्हणून राज्यभर ओळख आहे.

राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या वतीने त्यांच्या दोन पुस्तकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मिळाला आहे.

तरूण भारत

# संकटावर मात करण्यासाठी समानतेचा दृष्टिकोन हवा

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोणत्याही सामाजिक, सामूहिक संकटाच्या परिणामास सामोरे जाण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक धोरणे व कार्यक्रम सर्वसमावेशक आणि परिवर्तनात्मक असले पाहिजेत. या संकटांवर मात करण्यासाठी लिंगसमभाव दृष्टिकोनाची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांनी महाराष्ट्र शासनाचे महिला आर्थिक विकास महामंडळ व कांदिवली (मुंबई) येथील केईएस श्रॉफ कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'कोविड-१९ सदृश संकटकाळातील सामाजिक-आर्थिक धोरणे व जबाबदारी' हा या आंतरराष्ट्रीय परिषदेचा विषय होता.

डॉ. शिर्के म्हणाले, कोरोना हा बाह्य घटक असल्याने समाजात प्रचंड बदल घडून आले आहेत. समाजात कोरोना पॉझिटिव्ह, सामाजिक अंतर, अलगीकरण, विलगीकरण इत्यादी नवीन संकल्पना रूजू लागल्या आहेत. कोरोनामुळे परिस्थिती बिकट होत आहे. यात महिलांचाही बळी जात आहे. या दुष्परिणामांचा अभ्यास करण्यासाठी अजून बरेच दृष्टिकोन आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्ष ज्योती ठाकरे यांनी महिलांच्या विकासातील 'माविम'चे योगदान स्पष्ट केले. भारत सरकार महिला उच्चस्तरीय समिती माजी अध्यक्ष डॉ. पाम राजपूत यांनी मार्गदर्शन केले. मुंबई डॉ. विभूती पटेल, मुंबई डॉ. संगीता देसाई, दक्षिण आफ्रिका डॉ. मारीम, स्वीडन डॉ. चित्र सिन्हा यांनीही मार्गदर्शन केले. ऑस्ट्रेलियाच्या डॉ. एलिझाबेथ ब्रोडरिक यांनी समारोप केला. परिषदेत ९०० जणांनी ऑनलाईन सहभाग नोंदवला. पाच सत्रामध्ये ९३ शोधनिबंधांचे सादरीकरण केले. प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील, श्रॉफ महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. लिली भुसन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, परिषदेच्या संयोजक सचिव डॉ. प्रतिभा देसाई, व वैशाली ओझा यांनी संयोजन केले.

तरुण भारत

# राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी मोरे

प्रतिनिधी
मुंबई

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळावर जेष्ठ साहित्यिक सदानंद मोरे यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच २९ सदस्यांची नियुक्ती केली. सर्व सदस्यांचे मराठी भाषामंत्री सुभाष देसाई यांनी अभिनंदन केले आहे.

नियुक्त सदस्यांची नावे पुढील प्रमाणे, सदानंद मोरे (अध्यक्ष), डॉ. प्रज्ञा दया पवार, अरुण शेवते, डॉ. रणधीर शिंदे, श्रीमती निरजा, प्रेमानंद गज्वी, डॉ. नागनाथ कोतापल्ले, प्रविण बांदेकर, श्रीमती मोनिका मजेंद्रगडकर, भारत सासणे, फ. मु. शिंदे, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. रविंद्र शोभणे, योगेंद्र ठाकूर, प्रसाद कुलकर्णी, प्रकाश खांडगे, प्रा. एल. बी. पाटील, पुष्पराज गावंडे, विलास सिंदगीकर, प्रा. प्रदीप यशवंत पाटील, डॉ. आनंद पाटील, प्रा. शामराव पाटील, दिनेश आवटी, धनंजय गुडसुरकर, नवनाथ गोरे, रविंद्र बेडकीहाळ, प्रा. रंगनाथ पठारे, उत्तम कांबळे, विनोद शिरसाठ, डॉ. संतोष खेडलेकर यांचा समावेश आहे.

## शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख रणधीर शिंदे सदस्यपदी

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांची महाराष्ट्र शासन साहित्य, संस्कृती मंडळाच्या सदस्यपदी निवड झाली आहे. साहित्य अकादमीचे सदस्य म्हणून्ही त्यांनी काम पाहिले आहे. नामवंत साहित्य संस्थांचे सहा पुरस्कार मिळाले आहेत. विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राचे समन्वयक आहेत.